महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय , लेखा व कोषागारे
"कस्तुरी" इमारत, तळ मजला, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई ४०००२०.
दुरध्वनी क्रमांक: ०२२-२२६२२०३६ ई-मेल : aaomahapardat.mu-mh@gov.in

**संदर्भ :** १.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीएफआर १२११/प्र.क्र.२५७/तेरा, दि. ०२.०२.२०१७.
२.शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दि.०७.०२.२०१८.
३.शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीएफआर १२२०/प्र.क्र.११९/का.१३,दि.१७.११.२०२२.
४.शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीएफआर १२२०/प्र.क्र.११९/आस्थापं.१३,दि.२६.११.२०२४.

********************************************************************************

क्र.संलेको १२.२०२४/क.ले.३/महापार परिपत्रक/गोअक/ 613 दि. 16/12/2024

## परिपत्रक

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेच्या "गट- अ" व "गट- ब" (राजपत्रित) संवर्गातील संचालक ते सहाय्यक लेखा अधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल महापार प्रणालीमध्ये लिहिण्यात येतात.

महापार हे संकेतस्थळ आतापर्यंत सर्व Internet वर उपलब्ध होत होते. तथापि दि.०१.०८.२०२४ पासून सदर संकेतस्थळावर केवळ NICNET किंवा State wide area network (Swan-Dat )या internet वर उपलब्ध आहे अशा सूचना NIC, Data Center, Delhi यांच्याकडून प्राप्त झाल्या आहेत. सदर सुविधा NIC केवळ WEBVPN व्दारे उपलब्ध करून देणार आहे.

महापार प्रणालीमध्ये समाविष्ट असलेल्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत कार्यमुल्यमापन अहवाल भरताना WEBVPN सुविधेअंतर्गत Mahapar login करताना खालीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरायची आहे.









उपरोक्त Screenshots

१, २ व ३ प्रमाणे WEBVPN सुविधेअंतर्गत Mahapar login करणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी. महापार प्रणालीमध्ये WEBVPN सुविधेअंतर्गत Mahapar login होत नसल्यास Screenshot ३ येथील मुद्दा क्र. ४ मध्ये नमूद केल्यानुसार जर एखाद्या अधिकाऱ्यास web page २ व ३ व्यतिरिक्त page दिसत असल्यास संबंधितांनी त्यांचे नाव,

शासकीय ईमेल, भ्रमणध्वनी व सेवा विभाग बाबतची माहिती Excel sheet मध्ये भरून Error Screenshot सहीत support-mahapar@nic.in यांना मेल करण्यात यावी.

वरील संदर्भ क्र. ४ येथील दिनांक २६.११.२०२४ च्या शासन परिपत्रकान्वये कार्यमुल्यमापन अहवाल लिहिण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी १ महिन्याची म्हणजेच दिनांक ३१ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर मुदतवाढ अंतिम असल्याचे सुचित करण्यात आले आहे. सन २०२३-२४ या प्रतिवेदन वर्षाचे कार्यमुल्यमापन अहवाल दि. ३१ जानेवारी २०२५ रोजी महापार प्रणालीत बंद करण्यात येतील. कृपया याची नोंद घ्यावी. महापार प्रणालीमध्ये WEBVPN सुविधेअंतर्गत काही तांत्रिक अडचणी आल्यास support-mahapar@nic.in या ई-मेल वर संपर्क साधावा.

**वर नमूद केलेल्या वेळेत ही सर्व कार्यवाही केली जाईल याची जबाबदारी संबंधित आस्थापना अधिकारी/संस्करण अधिकारी यांची राहील.**

(रश्मी नांदिवडेकर)
सहसंचालक (प्रशासन)
संचालनालय, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.